महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, सहायक संचालक संवर्गातील नियुक्तीने देण्यात आलेल्या पदस्थापनेत अंशत: बदल करुन सुधारीत पदस्थापना देणेबाबत. श्रीमती वर्षा वसंत बांगर.

संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-20
01 AUG 2024
प्राप्त झाले सही......

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**

शासन आदेश क्रमांक:- संलेको-२०२४/प्र.क्र.६८/कोषा. प्रशा.२
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १ ऑगस्ट २०२४

संदर्भ :- वित्त विभाग, शासन आदेश क्रमांक संकीर्ण-२०२१/प्र.क्र.१७१/कोषा. प्रशा.२, दि.१५.०३.२०२४.

**शासन आदेश**

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, सहायक संचालक गट-अ (कनिष्ठ) संवर्गात नियुक्तीसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या परिविक्षाधीन अधिकाऱ्यांचा एकत्रित परिविक्षाधिन प्रशिक्षण कार्यक्रम (सीपीटीपी ७) समाप्त झाल्यानंतर सदरहू अधिकाऱ्यांना संदर्भाधीन आदेशान्वये सहायक संचालक संवर्गातील पदांवर पदस्थापना देण्यात आल्या आहेत.

सदर आदेशातील श्रीमती वर्षा वसंत बांगर यांना मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळात पद रिक्त नसल्याने गृहनिर्माण विभागाने रुजू करुन घेतले नाही. सबब, श्रीम. बांगर ह्या पदस्थापनेच्या प्रतिक्षेत असल्याने त्यांच्या संदर्भाधिन आदेश दि.१५/०३/२०२४ अन्वये देण्यात आलेल्या पदस्थापनेत अंशत: बदल करुन त्यांची सुधारीत पदस्थापना कोकण-२ या वाटप करण्यात आलेल्या महसूल विभागात खालील विवरणपत्रातील स्तंभ क्र.४ मध्ये नमुद केलेल्या पदावर संदर्भाधिन शासन आदेश दि.१५/०३/२०२४ मधील अटी व शर्थीच्या अधिन राहून करण्यात येत आहे.

| अ.क्र | अधिकाऱ्यांचे नाव | संदर्भाधिन आदेश दि.१५.०३.२०२४ अन्वये दिलेली पदस्थापना | अंशत: बदलीने पदस्थापनेचे पद व कार्यालय |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| १ | श्रीम.वर्षा वसंत बांगर. (ज्येष्ठता क्रमांक ९) | मुख्य लेखा अधिकारी/लेखा अधिकारी वर्ग-१, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा), मुंबई मंडळ. | सहायक संचालक, पोलीस आयुक्त कार्यालय, बृहन्मुंबई. |

२. उपरोक्त नमूद अधिकाऱ्यांनी पदस्थापनेच्या ठिकाणी तात्काळ रुजू व्हावे. सुधारित पदस्थापनेच्या ठिकाणी हजर होताच शासनास तसेच संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई यांना अवगत करावे.

३. हे आदेश तात्काळ अंमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(ता. र. पवार)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई.
संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा, कोकण भवन, नवी मुंबई. *
महालेखापाल १/२) लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा (महाराष्ट्र, मुंबई/नागपूर. *
सह सचिव, मा. उपमुख्यमंत्री (वित्त) यांचे कार्यालय
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
संबंधित अधिकाऱ्यांचे सध्याचे नियंत्रक कार्यालय*
संबंधित अधिकाऱ्यांच्या पदस्थापनेच्या कार्यालयाचे प्रमुख*
संबंधित अधिकारी*
निवडनस्ती कोषा प्रशा-१ व २ वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
(*संचालक, लेखा व कोषागारे, संचालनालय, मुंबई यांचे मार्फत)